सिद्ध साधक साधना
अभ्यास साठी

५ ऑगस्ट २०२२

November 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | | | | | |

Priority

FRI OCT 8 2010

Wk 40, 281-084

ॐ

## - हंसोपनिषद -

8 am उप + नि + सद् — गुरूच्या सान्निध्य नम्रतेने बसून ज्ञान मिळवणे - प्रमुख उपनिषद - १०
9 परंतु एकूण लहानमोठी - ५०० च्यावर
१०८ परिचित । अल्लोपनिषद या नावाचेही
10 एक उपनिषद आहे.

हंसोपनिषद - शुक्ल यजुर्वेदाचे आहे.

11 गौतम ऋषी आणि सनत कुमार यांच्यातील संवाद आहे.

तीन वेदांमध्ये परब्रह्माला हंसाची उपमा दिली
12 आहे. नीरक्षीर विवेक --- त्याप्रमाणे ब्रह्मज्ञानाने सत - असत । हेय - उपादेय । कर्तव्य - अकर्तव्य
1 pm यांच्यातील योग्य अयोग्य निवडीचे सामर्थ्य प्राप्त होते. शिवाय हंस हा पाण्यात राहूनही पाण्यापासून
2 अलिप्त असतो.. तसेच ब्रह्म हे या विश्वामध्ये ओतप्रोत भरलेले असूनही निःस्पृहतेमुळे त्यापासून
3 अलिप्त असते. या ब्रह्मतत्त्वाचे विवरण यात केले आहे.

4

5

6

7

© www.madhaveeraghuveer.com

गौतम उवाच

भगवन् सर्वधर्मज्ञो सर्वशास्त्रविशारद ।
ब्रह्मविद्याप्रबोधो हि केनोपायेन जायते ॥१॥

प्रश्नोत्तर रुपाने हा संवाद आहे. गौतम ऋषी विचारतात — हे भगवंता, तू सर्व धर्मांना जाणणारा आणि सर्वशास्त्रांमध्ये पंडित आहेस. यास्तव मला हे सांगा की ब्रह्मविद्याप्राप्ति कोणत्या उपायाने होऊ शकते?

तीन संबोधने - भगवन्, सर्वधर्मज्ञ, सर्वशास्त्रविशारद

सनत्कुमार उवाच -

विचार्य सर्वधर्मेषु मतं ज्ञात्वा पिनाकिनः ।
पार्वत्या कथितं तत्त्वं शृणु गौतम तन्मम ॥२॥

सर्वधर्मांविषयी विचार करून परमशिवाचे मत किंवा अभिप्राय समजून पार्वतीदेवीने मला जे ब्रह्मतत्त्व सांगितले ते तू आता ऐक.

धारयते इति धर्मः

असा धारण करण्यास योग्य असणाऱ्या धर्मांचे विवेचन ज्या शास्त्रामध्ये आले आहे अशी वेदांतशास्त्रे या अर्थाने अपेक्षित आहे.

शास्त्र - शासनात् त्रायते इति शास्त्र.

शास्त्राधार, शास्त्र काय सांगते?

तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।

©www.madhaveeraghuveer.com

अनाख्येयमिदं गुह्यं योगिने कोशसंनिभम् ।
हंसस्याकृतिविस्तारं भुक्तिमुक्तिफलप्रदम् ॥३॥

हे रहस्यमय ब्रह्मतत्त्व इतर कोणालाही सांगू नये. फक्त योगी पुरुषांनाच कथन करावे. ते ज्योतिर्पुंजाप्रमाणे तेजस्वी असून परमात्म्याच्या आकारासारखे विराट आहे. तसेच भुक्ति व मुक्ति अशी दोन्ही फळे देणारे आहे.

श्रेयस - प्रेयस । भुक्तिं मुक्तिं च विन्दति ।

हे तत्त्व अनधिकारी व्यक्तीला सांगितल्यास अनर्थ ओढवतो ∴ ते गोपनीय ठेवावे. गुह्यज्ञान

इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।

चित्तवृत्तींचे नियंत्रण करण्यास समर्थ असणारा तो योगीपुरुष ! तो हे तत्त्व जाणून गुह्य ठेवू शकतो.

हे तत्त्व कसे आहे? परमात्म्याच्या आकृतिविस्तारा-प्रमाणे ते तत्त्व विराटस्वरूपी व अज्ञानापासून मुक्ती देणारे आहे. ते ज्ञानात्मकोशाप्रमाणे उपभोग प्रदान करणारे तसेच मोक्ष देणारे देखील आहे.

अथ हंसपरमहंस निर्णयं व्याख्यास्यामः ।
ब्रह्मचारिणे दान्ताय गुरुभक्ताय हंसहंसेति सदा ध्यायन् ॥

आता ब्रह्मचारी, इंद्रियनिग्रह असलेला, गुरुनिष्ठा असलेला, श्रद्धाळू, सतत हंस हंस (सोऽहम्) असा जप करणारा अशा सर्वांसाठी हंस व परमहंस यांच्या निर्णयाची व्याख्या करणार आहे. हंस म्हणजे आत्मा आणि परमहंस म्हणजे परमात्मा।

हंसविद्येचा अधिकारी कोण? ब्रह्मचारी, संयतेन्द्रिय गुरुनिष्ठ, हंस-हंस चा जप करणारा, श्रद्धाळू - गौतममुनी

© www.madhaveeraghuveer.com

६ ऑगस्ट २०२२

सर्वेषु देहेषु व्याप्य वर्तते यथा ह्यग्निः काष्ठेषु।
तिलेषु तैलमिव तं विदित्वा न मृत्युमेति॥७॥

जसा लाकडामध्ये आग्नि व तिळामध्ये तेल व्यापून रहाते तसेच हा हंस सर्व शरीरांना व्यापून रहातो. साधक या हंसाच्या ज्ञानाने मृत्युलाही पार करतो.
आग्नि / तेल एका भागामध्ये व्यापून रहात नाही तर संपूर्ण कणाकणाला व्यापून टाकते तसा हा आत्मा देहात व्यापून रहातो. असा साधक मृत्युलाही घाबरत नाही. कारण तो जाणतो की शरीर नाशिवंत आहे आत्मा नित्य व अमर आहे.

गुदमवष्टभ्याधाराद्वायुमुत्थाप्य स्वाधिष्ठानं त्रिःप्रदक्षिणीकृत्य
मणिपूरकं गत्वा अनाहतमतिक्रम्य शिश्नाभ्ये पार्श्वे भवतः।
विशुद्धौ प्राणान्निरुध्याज्ञामनुध्यायन् ब्रह्मरंध्रं ध्यायन्।
त्रिमात्रोऽहमित्येव सर्वदा पश्यति अनाकारश्च भवति॥

डाव्या पायाने गुदप्रदेशाला दाबून कुंभक करून, मूलाधारातून प्राणवायूला वर नेऊन स्वाधिष्ठानचक्राला तीन प्रदक्षिणा करून पुढे मणिपूरचक्रामध्ये (नाभिचक्रामध्ये) प्रवेश करावा. त्यानंतर अनाहतचक्राला पार करून विशुद्धचक्राच्या खालच्या भागामध्ये पुरुषाच्या लिंगाप्रमाणे दिसणाऱ्या दोन मांसखंडाच्या मध्यभागातून विशुद्धचक्रामध्ये वायूला प्रवेश करावा. त्या ठिकाणी प्राणाचा निरोध करून म्हणजे प्राणवायूला थांबवून दोन भृकुटीमध्ये असलेल्या आज्ञाचक्रामध्ये प्रवेश करून ब्रह्मरंध्राचे म्हणजे सहस्रार चक्राचे ध्यान करावे. त्यावेळी त्रिमात्रोऽहम् म्हणजे (जागृती, स्वप्न, सुषुप्ती) या तीन अवस्था हे ज्याचे अधिकरण / आश्रय आहे असे तुरीयचैतन्य म्हणजे मीच आहे असे।

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

8 am प्रचिती येऊन तो साधक त्याचे दर्शन घेतो आणि तद्‌कार होतो.

9 ब्रह्मविद्या प्राप्त करायची असेल तर साधन कोणते? उपाय कोणता? या प्रश्नांची उत्तरे सनत्कुमार मुनींनी
10 या मंत्राच्या माध्यमातून दिली आहेत. त्यांच्या मते ब्रह्मज्ञानाची प्राप्ती ही अष्टांगयोगाच्या अभ्यासाने होऊ
11 शकते.

यम नियम आसन प्राणायाम
12 प्रत्याहार धारणा ध्यान समाधि } अष्टांग

गुरूंच्या सान्निध्यात निर्जनस्थानी, सिद्धासनारूढ
1 pm होऊन सात चक्रांमध्ये क्रमशः प्रवेश करावा.

१. मूलाधार - गुदप्रदेशापासून दोन बोटे वर याचे
2 स्थान आहे. तिथे 'कुंडलिनी' शक्तीचा निवास असतो. साधनेद्वारे कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यावर दिव्य
3 शक्तीसोबतच अलौकिक प्रतिभाही प्राप्त होते.

२. स्वाधिष्ठान - मूलाधारचक्रापासून दोन बोटे अंतरावर स्वाधिष्ठान चक्र असते. या चक्रावर लक्ष केंद्रित केल्यास मनातील चंचलता दूर होऊन ~~तेजस्विता प्राप्त होते~~

5 ~~३~~ ४. अनाहतचक्र - हृदयाच्या मध्यभागी. हृदयचक्र असेही म्हणतात. इथे जीवात्म्याचे निवासस्थान आहे. कवित्वशक्ती,
6 कलात्मकता, भक्तिभावना जागृत होण्यासाठी इथे लक्ष द्यावे

~~४~~. ३. मणिपूरचक्र - नाभिचक्र (स्थान नाभि). चंचलता दूर
7 होऊन तेजस्विता प्राप्त होते

५. विशुद्ध चक्र - गळ्याच्या मध्यभागी। मन शांत होते.

६. आज्ञाचक्र - दोन भुवयांच्या मध्ये - दिव्यदृष्टीचे केंद्र. याला शंकराचा तिसरा डोळा असेही म्हणतात.

७. सहस्रार चक्र - ब्रह्मरंध्र, नंदद्वार, विश्रांतिद्वार. ते तेजाचा पुंज आहे. आत्मानंद मिळतो.

Birthday / Anniversary

या सात चक्रांच्या आधारे ब्रह्मविद्या/हंसविद्या प्राप्त होते.

©www.madhaveeragni.com

एषोऽसौ परमहंसो भानुकोटिप्रतीकाशो
येनेदं सर्वं व्याप्तम् ॥७॥

एषः- हा, असौ- तो।
हा तोच परमात्मा आहे ज्याने हे संपूर्ण जग व्यापले आहे आणि तो एकाच वेळी उगवलेल्या अनंत कोटि सूर्यप्रकाशाप्रमाणे तेजस्वी आहे.

तस्य अष्टधा वृत्तिर्भवति। पूर्वदले पुण्ये मतिः। आग्नेये निद्रालस्यादयो भवन्ति। याम्ये क्रौर्ये मतिः। नैरृत्ये पापे मनीषा। वारुण्यां क्रीडा। वायव्यां गमनादौ बुद्धिः। सौम्ये रतिप्रीतिः। ईशान्ये द्रव्यदानम्। मध्ये वैराग्यम्। केसरे जाग्रदवस्था। कर्णिकायां स्वप्नम्। लिङ्गे सुषुप्तिः। पद्मत्यागे तुरीयम्। यदा हंसे नादो विलीनो भवति तत् तुरीयातीतम्॥८॥

याम्ये - दक्षिणदिशेच्या पाकळीवर। वारुण्याम् - पश्चिम-दिशेच्या पाकळीवर, कर्णिकायाम् - कमळाचे फळ / बीजकोश।

त्या हंसाची। जीवाच्या आठ प्रकारच्या वृत्ती आहेत- त्यांचा आधार असणारे हृदयकमळ बारा पाकळ्यांनी परिपूर्ण आहे.
हा हंस किंवा हे ब्रह्म मानवाच्या हृदयामध्ये ज्योतीच्या स्वरूपात विद्यमान असते असा उल्लेख अथर्ववेदामध्ये येतो.— स य एषोऽन्तर्हृदय आकाशः म्हणजे तो जो हा हृदयाच्या मध्यभागी असलेल्या आकाशात रहातो असे वर्णन तैत्तिरीय उपनिषदात आढळते. या हृदयाचा आकार कमळासारखा असून त्याला १२ पाकळ्या असतात. ७. हृदयकमळ

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

या हृदयकमळाच्या चार पाकळ्या (दले) स्पर्श न करू देणाऱ्या हंसाकडे (आत्म्याकडे) नेणाऱ्या आहेत. आणि उरलेली आठ दले या जगात व्यवहार करण्यासाठी प्रेरणा देणारी आहेत.

हा हंस किंवा प्राणोपाधिक जीव जेव्हा एकेका पाकळीवर प्रवेश करतो तेव्हा वृत्ती त्यानुसार होतात.

पूर्व पाकळी - पुण्यकर्म करण्याकडे कल वाढतो.
आग्नेय " - निद्रा व आळस वाढतो, क्रूरकर्म
दक्षिण " क्रूरकर्माकडे बुद्धि होते.
नैऋत्य " पापकर्माकडे कल होतो
पश्चिम " खेळण्यासाठी प्रेरणा मिळते.
वायव्य - " गमनागमन क्रियांचा वेग वाढतो.
उत्तर " आनंद आणि प्रेम यांचे प्रमाण वाढते.
ईशान्य " दान करण्याची वृत्ती वाढीला लागते.

अशा प्रकारची आठ दले आठ प्रकारच्या वृत्तींना जन्म देतात. जेव्हा हा हंस हृदयकमळाच्या दळांमध्ये प्रवेश करतो तेव्हा वैराग्यवृत्ती उदयाला येते.

कमळदळांच्या तंतुवर हंसाचा संचार असताना जागृतावस्था असते. अहंकृतीचा पूर्ण विकास झालेला असतो. पुढे जेव्हा हृदयकमळाच्या कर्णिकास्थानात म्हणजे बीजकोशात प्रवेश करतो तेव्हा स्वप्नावस्था असते. त्यावेळी अहंकृतीचा विकास अर्धा होतो. त्यानंतर मूळप्रदेशात हंसाचा प्रवेश होतो तेव्हा सुषुप्ति अवस्था असते. जेव्हा हा हंस त्या हृदयकमळापासून दूर होतो तेव्हा तुरीयावस्था असते त्या हंसाचा साक्षात्कार होतो. असा ब्रह्मसाक्षात्कार झाल्यावर तो हंस अंतर्बाह्य एकरूप होतो आणि जेव्हा या अंतरात्म्यात अर्धनादात्मक नाद विलीन होतो तेव्हा हा जीवात्मा स्वरूपामध्ये पुन्हा प्रतिष्ठित होतो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

Priority



8 am अधो नाद आधारात् ब्रह्मरंध्रपर्यन्तं शुद्धस्फटिक संकाशः स वै ब्रह्म परमात्मेति उच्यते ॥१॥

9 त्यानंतर म्हणजे निर्विकल्पसमाधी प्राप्त झाल्यावर 10 योग्याच्या हृदयात असलेला निर्गुण आत्मा, मूलाधारापासून ब्रह्मरंध्रापर्यंत गेल्यावर (तुरीय 11 अवस्थेला पोहोचल्यावर) शुद्ध स्फटिकाप्रमाणे विशुद्ध निर्मळ, प्रकाशमान होतो. ते शुक्लतेजस्वी ब्रह्मच 12 परमात्मा असे संबोधले जाते.

परमात्मा कशाला म्हणावे?

1 pm त्या परमतत्त्वावर चित्त एकाग्र होऊन सर्व चित्तवृत्तींचा नाश होतो. अशा योगीपुरुषाच्या देहामध्ये तेजस्वी 2 प्रकाश दृष्टीला पडतो. हा प्रकाश / तेज स्फटिकाप्रमाणे तेजस्वी असते, निर्मळ असते. त्याला परमात्मा म्हणतात.

3 परंतु या विशुद्ध तेजापर्यंत पोहोचण्याची किंवा त्या तेजस्वी तेजाचा साक्षात्कार होण्याची प्रक्रिया 4 मूलाधारापासून सुरू होऊन ब्रह्मरंध्रापर्यंत असते. ही प्रदीर्घ प्रक्रिया एखादा योगीपुरुषच पूर्ण करू शकतो.

5

अथ हंस ऋषिः । अव्यक्तगायत्री छन्दः । परमहंसो 6 देवता । हं बीजम् । सः शक्तिः । सोऽहं कीलकम् ॥२॥

7 ऋषि हंस, अव्यक्तगायत्री छंद, परमहंस देवता, हं हे बीज असून सः ही वर्णाक्षर शक्ति आहे. सोऽहम् हा मंत्र आहे. षड् इंद्रियांद्वारा (५ ज्ञानेंद्रिय व मन) अहोरात्र जपाची संख्या २१ ६०० आहे. या मंत्रानेच सूर्य, चंद्र, निरंजन, निराभास सूक्ष्माला सर्व अर्पण करावे, अंगन्यास व करन्यास करावा. हृदयामध्ये जीवात्म्यापासून भिन्न मानून परमात्म्याचे ध्यान करावे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

या मंत्रामध्ये अजपा हंस मंत्रप्रकार सांगितला आहे.
8 am मंत्रसिद्धिसाठी तांत्रिक बाबी आवश्यक आहेत.

षट्संख्यया अहोरात्रयोरेकविंशतिसहस्राणि षट्शतानि
10 अधिकानि भवन्ति। सूर्याय सोमाय निरंजनाय
निराभासाय अतनुसूक्ष्म प्रचोदयाते इति ॥११॥
11 अग्निषोमाभ्यां वौषट् हृदयाद्यङ्गन्यास करन्यासौ
भवतः ॥१२॥ एवं कृत्वा हृदये हंसमात्मानं ध्यायेत ॥१३॥

12

हंस — प्रपंचसार या प्रकरणग्रंथानुसार
1 pm हं कार म्हणजे पुरुष आणि सः ही प्रकृति आहे.
हं व सः या दोन वर्णांचा योग होऊन उत्पन्न
2 झालेल्या शक्तीला 'अजपा' असे संबोधले जाते.
म्हणूनच '(हंसः)' हा आत्ममंत्र म्हणजे जीवनमंत्र
3 म्हणजे अजपा असून प्रतिक्रियाद्वारे केला जाणारा आहे.
या अजपा मंत्राचा ऋषी 'हंस' म्हणजे जीवात्मा आहे.
4 जप करणाऱ्या गायकाला तारणारा — गायकं त्रायते इति।
म्हणून गायत्री हा छंद आहे. परमहंस - परमात्मा ही
5 देवता आहे. हं हे बीज तर सः ही शक्ती आहे.
हंसात्म साक्षात्कारासाठी या मंत्राचा जप करावा.
6 दिवसभर (अहोरात्र) श्वासोच्छ्वास संख्या २१,६००
∴ तितकीच जपसंख्या --- याचे ४ भागात विभाजन।
7 पहिला भाग — ब्रह्मपुत्र सूर्याला
दुसरा " — सूत्रभाव प्राप्त करणाऱ्या चंद्राला
तिसरा " शरीररहित, सूक्ष्म, विराट अशा सर्वेश्वराला
चौथा " — जीवात्म्यापेक्षा भिन्न अशा परमात्म्याला.
समर्पित करून अंगन्यासादि विधी करून मग
ब्रह्माचे परमात्म्याचे ध्यान हृदयात करावे.

अग्नीषोमौ पक्षावोंकारः शिर उकारो बिन्दुस्त्रिणेत्रं मुखं रुद्रो रुद्राणी चरणौ द्विविधं कण्ठतः कुर्यात इति उन्मनाः अजपोपसंहार इति अभिधीयते ॥१७॥ एवं हंसवशात्तस्मान्मनो विचार्यते ॥१८॥

अग्नीषोमौ - सूर्य आणि चंद्र पक्षौ - बाहू भुजा
अजपा - हंसविद्या.

सूर्य व चंद्र हे ज्याचे बाहू आहेत. ओंकार हे मस्तक असून बिंदूसहित असलेला अकार, उकार व मकार हे तीन नेत्र आहेत. रुद्र हे मुख असून, रुद्राणी व गंगा हे दोन चरण आहेत.

मोक्षाची इच्छा असणाऱ्याने सगुण आणि निर्गुण या प्रकारांनी कंठाद्वारे हंसध्यान करावे. अशा दोन प्रकारच्या ध्यानाने मुनींनी केलेला अजपा उपसंहार हा 'परमात्मा' म्हटला जातो. अशा प्रकारे हंसविद्येच्या आधीन झालेले मन 'ते कार्य माझे नाही, माझे नाही' असा विचार करायला प्रवृत्त होते.

यजुर्वेदीय मंत्रामध्ये निर्गुण ध्यानाविषयी सांगितले होते परंतु ते सर्वांना शक्य नाही. त्यासाठी सगुण ध्यान प्रकार या मंत्राद्वारे सांगितला आहे.

हंसविद्या प्राप्तीसाठी सगुण आणि निर्गुण असे दोन ध्यानप्रकार आहेत. इथे गुणासहित प्रतिमेच्या आधारे घेतला जातो. दोन बाहू, एक मस्तक, तीन डोळे, दोन पाय आणि एक मुख असलेल्या हंसाचे कंठाद्वारे ध्यान करणे म्हणजे 'सगुण ध्यान' आहे.

© www.madhaveeraghuveer.com

अस्यैव जपकोट्या नादमनुभवति । स च दशविधो जायते । चिणीति प्रथमः चिञ्चिणीति द्वितीयः । घण्टानादस्तृतीयः । शंखनादश्चतुर्थः । पञ्चमस्तन्त्रीनादः । षष्ठस्तालनादः । सप्तमो वेणुनादः । अष्टमो भेरीनादः । नवमो मृदङ्गनादः । दशमो मेघनादः ॥१६॥

या अजपाजपाने म्हणजेच 'सोऽहम् सोऽहम्' या मंत्राच्या कोटयवधि जपप्रभावाने दहाप्रकारचा नाद अनुभवास येतो. प्रारंभी 'चिण्' असा ध्वनि ऐकू येतो त्यानंतर 'चिण्-चिण्' असा ध्वन्यात्मक नाद ऐकायला मिळतो. तिसरा प्रकार हा घंटानादाप्रमाणे असतो. शंखनादाप्रमाणे अभिव्यक्त होणारा नाद हा चौथ्या प्रकारात मोडतो. पाचव्या प्रकारात वीणानाद ऐकायला मिळतो. तालनादाप्रमाणे सहावा नादप्रकार असतो. सुस्वर वेणुवादनासारखा सातवा नाद आपल्या कानामध्ये गुणगुणत असल्याचा अनुभव येतो. आठवा नादप्रकार हा भेरीनादासमान वाटतो. मृदंगनादाचे अनुकरण करणारा नववा नादप्रकार आहे. तसेच दहावा नादप्रकार हा मेघांच्या गडगडाट प्रमाणे भयंकर असतो.

मोक्षप्राप्तिची इच्छा असेल परंतु सगुण/निर्गुण यापैकी कोणतेही ध्यान करणे शक्य नसेल तेव्हा काय करावे? कोणता मार्ग अनुसरावा? याचे उत्तर इथे मिळते. कोणतीही व्यक्ती श्वासोच्छ्वास तर अहोरात्र करत असते. त्या श्वासाला व उच्छ्वासाला जोडून शांतपणे अजपा जप करावा. दररोज २१,६०० असे करत ही संख्या कोटयवधि होईल तेव्हा त्याला दहा प्रकारचे नाद क्रमाक्रमाने ऐकू येऊ लागतील. चिण, चिणचिण, घंटा, शंख, वीणा, ताल, वेणु, भेरी, मृदंग, मेघनाद। असे नादश्रवण होणारा साधक योग्य मार्गाने ब्रह्ममार्गाकडे जात आहे असे समजावे.

© www.madhaveeraghuveer.com

नवमं परित्यज्य दशममेवाभ्यसेत् ॥१८॥

मुमुक्षुने पहिले नऊ प्रकार न अभ्यासता ~~[illegible]~~ फक्त दहाव्या प्रकाराचा अभ्यास करावा. तोच नादप्रकार परब्रह्मापर्यंत पोहोचवण्यासाठी सहाय्यक ठरतो. इतर नऊ प्रकार नानाविध सिद्धी मिळवून देतात. त्यात जर साधक अडकला तर मुख्य ध्येयापासून ढळू शकतो. १० व्या नादप्रकाराच्या अभ्यासाने तो मुक्तिरूप फळाचा भागीदार होऊ शकतो.

प्रथमे चिञ्चिणीगात्रं द्वितीये गात्रभञ्जनम् ।
तृतीये भेदनं याति चतुर्थे कम्पते शिरः ॥१२॥
पञ्चमे स्रावते तालु षष्ठेऽमृतनिषेवणम् ।
सप्तमे गूढविज्ञानं परा वाचा तथाष्टमे ॥१८॥
अदृश्यं नवमे देहं दिव्यं चक्षुस्तथाऽमलम् ।
दशमं परमं ब्रह्म भवेद् ब्रह्मात्मसान्निध्यौ ॥२०॥

यापूर्वीच्या मंत्रामध्ये दहा प्रकारच्या नादानुभवांचे वर्णन केले आहे. त्या नादानुभवाचे फळ या मंत्रात सांगितले आहे. प्रत्येकाचे फळ विभिन्न आहे.
जेव्हा कोणत्याही संख्येने 'सोऽहम् सोऽहम्' असा जप केला जातो. तेव्हा प्रत्येक अवयवातून चिण असा ध्वनी ऐकू येतो. म्हणूनच तो साधक चिञ्चिणीगात्र होतो. हा पहिला नादानुभव आहे. दुसऱ्या प्रकारात या चिञ्चिणीगात्रांचा नाश होतो. अर्थात चिण चिण हा ध्वनी त्या अवयवांना भेदून शरीरात प्रवेश करतो. तिसऱ्या प्रकारात शरीरात प्रविष्ट झालेला ध्वनि हृदयाला भेद करून हृदयकमळाचा विकास करतो. चौथ्या प्रकारात मस्तक कंपायमान होते. याचाच अर्थ चतुर्थ नादप्रकार



©www.madhaveeraghuveer.com

November 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | | | | | |

WED OCT 20 2010

Wk 42, 293-072

Priority सोन चोखा मेळा यांच्या देहपतना. नंतर त्यांच्या अस्थिमधून विठ्ठल - विठ्ठल असा आवाज येत होता.

हा कुंभकाप्रमाणे असतो. कुंभक प्राणायाममध्ये रोधून धरलेला वायु आज्ञाचक्रामध्ये प्रवेश करताच मस्तकाची स्थिती कंप पावल्याप्रमाणे होते. त्याचाच अनुभव इथे येतो.

तंत्रीनादाप्रमाणे अभिव्यक्त होणाऱ्या पाचव्या नाद-प्रकारामध्ये टाळू पाझरतो. लाळ गळायला लागते. तालनाद अभिव्यक्त होणाऱ्या सहाव्या प्रकारामध्ये अमृताचा आस्वाद घेता येतो. म्हणजेच चंद्र सूर्य या दोन्ही ग्रहांचे तेज परस्परात मिसळले जाऊन त्यातील भेद नाहीसा होतो. शीतोष्ण स्थिती म्हणजेच स्थितप्रज्ञ स्थितीचा अनुभव (अविनाशी स्थिती) घेता येतो.

भेरीनादाप्रमाणे अनुभव येणे हा आठवा प्रकार आहे. यामध्ये परा वाणी कार्यरत होऊन साधक सकळशास्त्र जाणता होतो. नवव्या नादानुभवाने देह अदृश्य करण्याची शक्ती म्हणजे अंतर्धान पावण्याची शक्ती साधकाला प्राप्त होते तसेच दिव्यदृष्टी लाभते. दहावा प्रकार मेघनादाप्रमाणे असतो. त्यामुळे परब्रह्माशी तदाकारता साधता येते. जीवात्मा व परमात्मा यांचे ऐक्य साधले जाऊन साधकाला एकाच परिपूर्ण, नित्य, अविनाशी अशा अक्षय तत्वाचा अनुभव येतो.

अनुभव येतो, असे जरी सोयीसाठी म्हटले असले तरी ही स्थिती अनुभवाच्या पलीकडची असते. केवळ एकच तत्व शिल्लक राहते, ते म्हणजे ब्रह्मतत्व!

ऋग्वेद व अथर्ववेदात चार वाणींचा उल्लेख —

परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी ----

परा — नित्य, अक्षय, अनादि-अनंत आहे. वाणीची सूक्ष्म अवस्था

पश्यन्ती - विचारतरंग उठणे, भाव व्यक्त करण्याची इच्छा/अव्यक्त

मध्यमा - विचारांना अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न

वैखरी - विचार/भाव या वाणीद्वारे प्रकट होतात

Birthday / Anniversary व्यवहार पूर्ण करण्यासाठी वैखरी आवश्यक आहे.

© www.madhavveeraghveer.com

21 THU OCT 2010

Wk 42, 294-071

Priority: Omniscient, Omnipresent Omnipotent

| October 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

तास्मिन्मनो विलीयते। विलीने मनासि संकल्प-विकल्पे दग्धे पुण्यपापे सदाशिवः शक्त्यात्मा सर्वत्रावस्थितः स्वयंज्योतिः शुद्धो बुद्धो नित्यो निरञ्जनः शान्ततमः प्रकाशयतीति वेदानुवचनं भवति इत्युपनिषद् ॥ २१॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

त्या ब्रह्मामध्ये मन विलीन होते. विलीन झालेल्या मनामधील संकल्प विकल्प नाहीसे होतात. पुण्य आणि पाप जळून खाक होतात. मग अशा संकल्पविकल्पविरहित, पापपुण्यरहित निर्मळ मनामध्ये सर्वत्र अस्तित्वात असणारा स्वयंज्योति, शुद्ध, सर्वज्ञ, नित्य, निरंजन, तेजस्वी सदाशिव शक्त्यात्म्याचा साक्षात्कार होतो असे वेदवचन आहे.

संकल्प-विकल्प करणे हे मनाचे कार्य असते. मनच पापपुण्याचे विभाजन करते. नानाविध विकार उत्पन्न करणारे ही मनच असते.

योगश्चित्तवृत्तिनिरोधः यानुसार मनाच्या या सर्व वृत्तींचा नाश तेव्हाच होतो जेव्हा मन परब्रह्मामध्ये विलीन होते. किंवा Vice aversa

अशी अवस्था होते तेव्हा ब्रह्मात्मतत्त्वाचा साक्षात्कार योगीपुरुषाला किंवा साधकाला होतो. हे ब्रह्मात्मतत्त्व स्वयंज्योति, सर्वज्ञ, नित्य, तेजस्वी, शुद्ध आणि निरंजन आहे. परब्रह्माचे असे स्वरूप वेदांमध्येही आढळते.

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com